# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# रविवारी पाटणमध्ये चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

▲ **पाटण,** दि. ९ : येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अभीष्टचिंतन सोहळा रविवार, दि. १२ रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने प्रा. डी. डी. चव्हाण लिखित ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होत असून याप्रसंगी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृहात माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे उपस्थित राहणार असून यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या अभीष्टचिंतन व चरित्र ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास साहित्य व शिक्षणप्रेमींसह सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्यावतीने संयुक्तपणे करण्यात आले आहे.